# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 12 May 2025
# Time 17.20 to 17.30
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १२ मे २०२५ सायंकाळी ५.२०

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आज रात्री आठ वाजता देशाला उद्देशून संबोधन
- भारतीय सेनेची सर्व यंत्रणा आणि उपकरणं सुस्थितीत–गरजेनुसार कारवाईसाठी सुसज्ज
- नागरी उड्डाणांसाठी बंद केलेली उत्तर पश्चिम भागातली ३२ विमानतळं पुन्हा कार्यान्वीत
- दहावीचा निकाल उद्या जाहीर होणार
- देशभरात बुद्ध पौर्णिमा भक्तीभावाने साजरी

आणि

- विराट कोहलीची कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज रात्री आठ वाजता देशाला संबोधित करणार आहेत. दरम्यान, आज दुपारी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत एक उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान, तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख उपस्थित होते.

****

भारतीय सेनेची सर्व यंत्रणा आणि सगळी उपकरणं सुस्थितीत असून, गरजेनुसार आगामी कारवाईसाठी सुसज्ज असल्याचं, संरक्षण दलाकडून सांगण्यात आलं आहे. आज दुपारी तीनही सैन्य दलांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत सैन्य दलाचे सैन्य कार्यक्रम महासंचालक–डीजीएमओ राजेश घई, एअर मार्शल ए के भारती आणि

व्हाईस ॲडमिरल ए एन प्रमोद यांनी ही माहिती दिली. भारताने सहा आणि सात मे च्या रात्री फक्त दहशतवादी तळांवर हल्ला केला होता, मात्र, भारताची दहशतवादाविरोधातली लढाई पाकिस्तानने स्वत:वर ओढवून घेतली, आणि त्या कारवायांच्या उत्तरात पाकिस्तानचं जे नुकसान झालं, त्याला पाकिस्तान स्वत: जबाबदार असल्याचं, एअर मार्शल भारती यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट – एअर मार्शल ए के भारती**

भारताच्या वायू सुरक्षा यंत्रणेने नष्ट करून पाडलेल्या क्षेपणास्त्रांचे तुकडे, पाडलेले ड्रोन्स तसंच इतर अवशेषांची छायाचित्रं यावेळी दाखवण्यात आली. हे अवशेष पाकिस्तान वापरत असलेल्या चिनी बनावटीच्या क्षेपणास्त्रांचे असल्याचं स्पष्ट झालं आहे.

ऑपरशन सिंदूर दरम्यान तीनही सैन्यदलांनी उत्तम समन्वय राखत कारवाई केल्याचं, तसंच सरकारनेही या कारवाईला पूर्ण पाठिंबा दिल्याचं, डीजीएमओ राजीव घई यांनी सांगितलं.

व्हाईस ॲडमिरल प्रमोद यांनीही नौदलाच्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. ते म्हणाले...

**बाईट – व्हाइस ॲडमिरल ए. एन. प्रमोद**

दरम्यान, भारत आणि पाकिस्तानी सैन्यदलाचे डीजीएमओ यांच्यात आज दुपारी नियोजित असलेली चर्चा होऊ शकली नाही, ही चर्चा आज संध्याकाळी होणार असल्याचं वृत्त आहे.

****

भारत पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेसह जम्मू काश्मीरच्या सीमावर्ती भागात काल रात्रीपासून शांतता असल्याचं, भारतीय सैन्यदलानं म्हटलं आहे. पाकिस्तानने काल रात्रीपासून कुठेही हल्ले किंवा चिथावणीखोर हालचाली केल्या नाहीत, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर नागरी उड्डाणांसाठी बंद केलेली ३२ विमानतळं पुन्हा कार्यान्वीत करण्यात आली आहेत. भारतीय विमानतळ प्राधिकरणानं आज

पत्रकाद्वारे ही माहिती दिली. याबाबतच्या अद्ययावत माहितीसाठी प्रवाशांनी थेट विमान कंपन्यांशी संपर्क साधावा, असं आवाहन प्राधिकरणानं केलं आहे.

****

भारतीय सैन्यानं ज्या ताकदीनं आणि अचूकतेनं ऑपरेशन सिंदूर राबवलं ते अभूतपूर्व असून राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयानं काम करेल, असं मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आज वर्षा या निवासस्थानी झालेल्या सुरक्षा विषयक बैठकीत ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह संबंधित अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत गुप्तचर विभागाच्या माहितीची देवाण घेवाण झाली. मुंबईची सुरक्षा तसंच सायबर सुरक्षेबाबतही या बैठकीत विशेष चर्चा झाली.

दरम्यान, राज्यातील सहकार कायद्यात कालानुरूप बदल करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली आहे. ते आज मुंबईत एका परिसंवादात बोलत होते.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या, इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल, उद्या दुपारी १ वाजता जाहीर होणार आहे, असं मंडळाच्या अधिकृत पत्रकात म्हटलं आहे. विद्यार्थ्यांना त्यांचे विषयनिहाय गुण, मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर पाहता येतील.

****

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पातून डिसेंबर २०२५ पर्यंत धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात रामदारा तलावात पाणी पोहोचेल, अशी माहिती तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. मोहोळ तालुक्यातील भोयरे पंपगृहाची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. आगामी पावसाळ्यात या कामाची प्रत्यक्ष चाचणी घेतली जाईल आणि या कामाला गती देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असंही आमदार पाटील यांनी सांगितलं.

****

देशभरात आज बुद्धपौर्णिमा साजरी करण्यात आली. बिहारमध्ये बुद्धगया इथं थायलंड, व्हिएतनाम आणि म्यानमार या देशांमधून लाखो भाविकांनी बुद्ध जयंतीनिमित्त महाबोधी मंदिरात विशेष प्रार्थना सभेत हजेरी लावली. राज्यात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून तथागत भगवान गौतम बुद्धांना

अभिवादन करण्यात आलं. छत्रपती संभाजीनगरात संदेश फेरी काढून भगवान गौतम बुद्धांचा शांतीचा संदेश देण्यात आला. शहरातल्या सिद्धार्थ उद्यानात बुद्धांच्या पुतळ्याला अभिवादनासाठी उपासकांनी मोठी गर्दी केली होती. परभणी तसंच बीड जिल्ह्यात अंबाजोगाई शहरासह ठिकठिकाणी धम्म रॅली काढण्यात आली.

****

क्रिकेटपटू विराट कोहलीनं कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. २०११ च्या मध्यात वेस्ट इंडिज दौऱ्यात त्यानं कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. १४ वर्षांच्या कारकिर्दीत विराटने १२३ कसोटी सामन्यात ४६ पूर्णांक ८५ शतांश सरासरीनं ९ हजार २३० धावा केल्या आहेत. कसोटी क्रिकेटनं आपल्या खेळाला आकार दिला तसंच महत्त्वाचे बारकावेही शिकवले, असं कोहलीनं त्याच्या सोशल मीडियावर सामायिक केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

****

तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मंदिरात महिलांना पर्स, बॅग आणि तत्सम वस्तू घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. भाविकांनी कोणतंही सामान मंदिर परिसरात आणू नये, असं स्पष्ट आवाहन मंदिर प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. सुरक्षेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या या व्यवस्थेला भाविकांनी संयम बाळगून सहकार्य करावं, असं आवाहनही मंदिर व्यवस्थापनाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

****

उस्मानाबाद रेल्वे स्थानकाचे नामांतर करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने परिपत्रक काढले असून, केंद्र सरकार तसंच रेल्वे विभागाकडून “धाराशिव” हे नाव अधिकृतपणे वापरण्यास मान्यता मिळावी यासाठी कार्यवाही सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अटल अमृत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा तसंच धाराशिव तुळजापूर सोलापूर नवीन रेल्वे मार्गाचा धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी आढावा घेतला. धाराशिव–तुळजापूर–सोलापूर रेल्वे मार्गाचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण होणं अपेक्षित असून, या कामातले अडथळे दूर करतांना नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची खबरदारी घेण्याचं आवाहन खासदारांनी केलं.

****

छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक घेतली, शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या हिताच्या योजनांची माहिती पोहोचवा. प्रत्येक विभागाच्या स्वतंत्र बैठका घेऊन शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत उपाययोजना राबवा. खरीप हंगामात कोणत्याही बाबीचा तुटवडा भासणार नाही याचे नियोजन करा,असे निर्देश शिरसाट यांनी दिले

****